REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, **अर्थ**,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १६ फेब्रुवारी, १९३८ | अंक ७

सदरहु मजकूर जाहिरात म्हणून आहे
मे. रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई यांचे ऑफिसांत फाईल केलेल्या प्रॉस्पेक्टसच्या आधारावरच शेअर्स मंजूर केले जातील.

## धी न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिआ, लि.

### हेड ऑफिस : ४१ ए. सी. ब्रूस स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

**अधिकृत भांडवल : रु. ३००००००. येणेंप्रमाणें विभागलेलें. ९६००० ऑर्डिनरी शेअर्स. प्रत्येकीं रु. २५; ८०००/५% क्यु. प्रेफरन्स. प्रत्येकीं रु. ५०/- व ४०० डिफर्ड शेअर्स प्रत्येकीं रु. ५००/-**

### विक्रीस काढलेलें भांडवल

४०० डिफर्ड रु. ३००/- अर्जाबरोबर.
रु. २००/- मंजुरीनंतर.
८०००/५% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स. अर्जाबरोबर रु. २० मंजुरीनंतर रु. १५ मंजुरीनंतर तीन महिन्यांनीं रु. १५.

४८०००/-ऑर्डिनरी. अर्जाबरोबर रु. १२½. अर्जमंजुरीनंतर कांहीं भरावयाचें नाहीं. बाकीची रक्कम रु. १२½ अनकॉल्ड रिझर्व्ह म्हणून राहील.

**दोन लाखांचे शेअर्स अगोदरच खपले आहेत**

पहिले एक लाख रुपये दर्शनी किंमतीचे शेअर्स डायरेक्टर्स, त्यांचे स्नेही व ऋणानुबंधी ह्यांनीं घेतले आहेत.

दुसरे एक लाख रुपये दर्शनी किंमतीचे शेअर्स मेसर्स जोगळेकर आणि कंपनी कॉंट्रॅक्टर्स, पुणें व मुंबई, ह्यांनीं अंडरराईट केले आहेत.

डायरेक्टरांपैकीं रा. जी. एस. मराठे, रा. जी.व्ही. पुराणिक व रा. डी.डी. देशपांडे हे अंडररायटर्सच्या फर्मचे भागीदार असल्यामुळें अंडररायटर्सना मिळावयाच्या कमिशनमध्यें त्यांचे हितसंबंध आहेत. अंडररायटर्सचा करार ऑफिसचे वेळांत केव्हांही पहावयास मिळेल.

**अध्यक्ष : श्री. जमनादास एम्. मेहता,**
एम्. ए., एलएल्. बी., माजी मेयर, मुंबई,
माजी अर्थमंत्री, मुंबई सरकार, मुंबई.

**उपाध्यक्ष : श्री. ल. ब. भोपटकर,**
एम्. ए., एलएल्. बी., ॲडव्होकेट,
व्हाईस प्रिन्सिपॉल, लॉ-कॉलेज, पुणें.

☞ शेअर्स प्रॉस्पेक्टस व अर्ज खालील सर्व बँका व त्यांच्या शाखांमधून मिळतील. अर्जासोबतचे पैसे व अर्ज बँका अगर त्यांच्या शाखांमार्फत पाठविणें.

**बँकर्स**

१ इंपीरिअल बँक ऑफ इंडिया, मुंबई व शाखा.
२ बँक ऑफ इंडिया, लि., मुंबई व शाखा.
३ बँक ऑफ बरोडा, मुंबई व शाखा.
४ बाँबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई व शाखा.
५ बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें.

बँकेचा विशेष—ठेवीदारांतर्फे डायरेक्टर नेमण्याची व्यवस्था केली आहे. ठेवीदारांतर्फे पहिले डायरेक्टर: मि. मेयर निसिम, एम. ए., ( डायरेक्टर, ओरिएंटल विमा कं. लि. ) श्री. द. दा. देशपांडे, बी. ए., एफ. सी. आर. ए. (ग्लासगो) मॅ. डायरेक्टर.

# विविध माहिती

**माजी जर्मन बादशहांचा एकूणऐंशीवा वाढदिवस**

जर्मनीचे माजी बादशहा (कैसर) ह्यांचा ७९ वा वाढदिवस नुकताच साजरा झाला. लांकडें फोडणें हा त्यांचा आवडता व्यायाम आहे.

**फळें आणि भाज्या ह्यांच्या विक्रीबाबतची प्रांतिक कमिटी**

फळें आणि भाज्या ह्यांच्या विक्रीच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याच्या हेतूनें मुंबई सरकारनें नेमलेल्या कमिटीची मुदत आक्टोबर १९३७ पासून तीन वर्षेपर्यंत वाढवण्यांत आली आहे.

**हिंदी रेल्वेजकरितां नवीन नियामक मंडळ**

फेडरेशनच्या घटनेचें एक अंग म्हणून हिंदी रेल्वेजच्या नियमनासाठी रेल्वेबोर्डाच्या जागीं स्वतंत्र अधिकारी मंडळ स्थापण्याचा सरकारचा विचार आहे. त्याकरितां सध्यांच्या रेल्वे ॲक्टांत दुरुस्ती व्हावी लागेल. त्या विषयींचें बिल सरकारनें मध्यवर्ती असेंब्लींत मांडलें असतां तें लोकांचें मत अजमावण्यासाठी प्रसिद्ध करावें ही सूचना मान्य झाली. फेडरेशनला विरोध ह्या सूचनेच्या मुळाशीं होता.

**म्हैसूर संस्थानांत तुपाचा कारखाना**

म्हैसूर संस्थानच्या सहायानें बंगलोर येथें चार लक्ष रुपये भांडवलाचा वनस्पतिजन्य तुपाचा कारखाना काढण्याचें ठरलें आहे. संस्थान ह्या कंपनीस एकदशांश भांडवल पुरवणार असून कित्येक सवलतीहि देणार आहे.

**म्हैसुरी मालाचा परदेशांत प्रचार**

हिंदी, विशेषतः म्हैसूर संस्थानाच्या, मालाचा परदेशांत खप वाढविण्याचे हेतूनें चार हिंदी तरुण चार वर्षांचा दौरा काढून जगभर फिरणार आहेत. रेल्वे व आगबोट कंपन्यांनीं त्यांस भाड्याचे दरांत सवलत दिली असून म्हैसूर सरकार त्यांच्या प्रवासाचा कांहीं खर्च सोसणार आहे.

**त्रावणकोरमधील सरकारी तिजोऱ्यांचें काम**

ब्रिटिश हिंदुस्थानांतील सरकारी तिजोरीचें काम शक्य त्या ठिकाणीं इंपीरियल बँकेकडे सोंपविण्यांत आलेलें आहे. ह्याच धर्तीवर त्रावणकोर संस्थान वरील बँकेकडे आपल्या हद्दींतील संस्थानी तिजोऱ्यांचें काम देणार आहे.

**रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँका—शाखांचें संख्येंत वाढ**

रिझर्व्ह बँकेला जोडलेल्या (शेड्यूल्ड) बँकांची संख्या चारानें वाढून ती गेल्या सालीं ५४ झाली. बँकांच्या शाखा व उपशाखा ह्यांच्या संख्येंतहि मोठी भर पडली. एका वर्षाचे अवधींत त्यांची संख्या ८२८ ची १,१३८ झाली.

**फेडरल रिझर्व्ह बँक ऑफ चायना**

चीनच्या फेडरल रिझर्व्ह बँकेच्या कामास १ मार्च रोजीं पेकिंग व टीन्स्टीन येथें प्रारंभ होईल.

**मि. फायरस्टोन ह्यांचा मृत्यु**

फायरस्टोन टायर कंपनीचे प्रमुख, मि. हार्वे फायरस्टोन, हे गेल्या आठवड्यांत आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी मृत्यु पावले. १९२६ सालीं त्यांनीं लैबीरिया देशांत १० लक्ष एकर जमीन खंडानें घेऊन थोड्याच अवधींत त्यापैकीं ६० हजार एकरांत रबराची लागवड केली. त्यांनीं फायरस्टोन टायर ॲन्ड रबर कंपनीची १९०० सालीं स्थापना केली, त्यावेळीं त्यांचे हाताखालीं १७ कामगार होते. आज त्या कंपनीमध्यें ४० हजार लोक कामावर आहेत.

**मनुष्य आणि माकड**

मनुष्यजातीची उत्पत्ति माकडापासून झाली आहे ह्या डार्विनिअन सिद्धांतानें मागें खळबळ उडवून दिली होती, तेव्हां त्याचा निषेध करणारे एक धर्माधिकारी उद्गारले:—"हे पाखंडी लोक स्वर्गांतील माझ्या पूर्वजांच्या वाटेस जाणार नसतील तर पशुसंग्रहालयांतील त्यांच्या पूर्वजांच्या वाटेस मीहि जाणार नाहीं." उत्क्रांतीचें तत्त्व धार्मिक कल्पनांस बाधक नाहीं अशी उदारबुद्धीची समजूत अलीकडे विलायतेंत पसरत आहे, हें प्रगतीचें लक्षण आहे.

**बँकांच्या (रविवार सोडून) अधिकृत सुट्या**

इंग्लंडमध्यें बँकांस देण्यांत येणाऱ्या वार्षिक सुट्यांचे दिवस ६ आहेत. स्कॉटलंडमध्यें ते ५ आहेत. आयर्लंडमधील बँका वर्षांतून ८ सुट्या घेतात व बेल्जममध्यें सुट्टीचे दिवस १६ असतात. फ्रान्स व जर्मनी ह्या देशांत ही संख्या ९ आहे व अमेरिकेंत ११ आहे. दक्षिण अमेरिकेंतील बँकांमध्यें सुट्यांची चंगळ आहे. त्यांची संख्या तेथील निरनिराळ्या देशांमध्यें १६ ते २८ पर्यंत आहे. हिंदुस्थानांत २४ सुट्या मिळतात.

**पदार्थसंग्रहालयांचा खर्च**

मुंबई इलाख्यांतील पदार्थसंग्रहालयांपैकीं दोन संग्रहालयांचा सर्व खर्च सरकार करतें. सातारा येथील संग्रहालयावर १९३६-३७ सालीं ५,७०० रु. खर्च झाला व विजापूर येथील संग्रहालयाचे वाटणीस १,३०० रु. आले. मुंबई शहरांतील प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियमवर सरकारनें ८४,७०० रु. खर्च केले.

**ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. ७ आ. १ पै व्याज**

गेल्या ८ तारखेस रिझर्व्ह बँकेनें १½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ७ आ. १ पै इतका पडला.

**लोकसंख्या वाढविण्याचें जर्मनीचें यशस्वी धोरण**

लोकसंख्या वाढविण्याचें जर्मन सरकाराचें धोरण यशस्वी झालें आहे. पूर्वीच्या जननसंख्येच्या मानानें पहातां गेल्या पांच वर्षांत अपेक्षेपेक्षां दहा लक्ष अधिक मुलें जर्मनींत जन्मास आलीं.

**जमीन महसुलाची वसुली**

१९३६–३७ मध्यें मुंबई इलाख्यांतील जमीनमहसुलाची वसुली ९९·६७ टक्के होऊन सरकारास ३,२०,६८००० रु. मिळाले. एकूण ५७¾ लक्ष रुपयांची माफी व तहकूबी देण्यांत आली.

**तारीख का मिती?**

एखाद्या हुंडीवर इंग्रजी तारीख व देशी मिती दोन्ही असून त्यांस येणारा दिवस भिन्न असेल तर तारीख प्रमाण मानावी हा मुंबईंतील सराफ व व्यापारी ह्यांच्या संस्थांचा रिवाज आहे. हिंदुस्थानी नेटिव्ह मर्चंटस असोसिएशनचा अभिप्राय त्यांस न जुळल्यामुळें अनेक व्यापारी संस्थांच्या प्रतिनिधींची सभा भरून वर दिलेला व कित्येक वर्षे अस्तित्वांत असलेला प्रघात चालू ठेवावा असें तीमध्यें ठरलें.

**इटलींत नवें साम्राज्य-गीत**

इटलीसाठी साम्राज्य-गीत तयार होत असून त्यासंबंधानें सुचविलेल्या गीतांत इटलीस आफ्रिकेंत मिळालेल्या विजयाचा द्योतक असा जळजळीतपणा नाहीं ह्या अर्थाची लोकांची तक्रार आहे. कृत्रिम प्रकारचा माल तयार करण्याच्या अलीकडील संवयीमुळें इटलीमध्यें जातिवंत उत्साह नाहींसा झाला आहे कीं काय अशी पृच्छा एका टीकाकारानें ह्यावर केली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ७४ | ५ गोवर्धनाचें महत्त्व | ७८ |
| २ प्रॉव्हिन्शियल को. इन्स्टि-ट्यूट ( अग्रलेख १ ) | ७५ | ६ हिंदी रेल्वेजच्या बजेटांत वाढावा | ७८ |
| ३ हिंदुस्थानांतील विम्याचा धंदा ( अग्रलेख २ ) | ७६ | ७ गिरणी कामगारांचे मजुरींत वाढ ! | ७८ |
| ४ स्फुट-विचार | ७७ | ८ न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया | ७९ |
| मुंबईमध्यें दुसरी स्टॉक एक्सचेंज—दोन रोखे बाजार कशाला !—महाराष्ट्र अर्बन बँक्स ॲन्ड सोसायटीज यूनियन—जीवनांत पैशाचें स्थान | | ९ फलटण श्रीलक्ष्मी सें.को. बँक | ८० |
| | | १० "शुनःकपाले लगुडःप्रहारः" | ८० |
| | | ११ अर्थशास्त्राचा अभ्यास | ८१ |
| | | १२ खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन | ८१ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ८२ |



# अर्थ

बुधवार, ता. १६ फेब्रुवारी, १९३८


## प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट

ह्या संस्थेची घटना, कार्याचा व्याप, अधिकार व सांपत्तिक स्थिति ह्यांसंबंधाची वाटाघाट आज कित्येक वर्षें चालली असून तो प्रश्न सध्या अगदी निकडीचा होऊन गेला आहे. इलाख्यांतील सहकारी चळवळीची मध्यवर्ती प्रातिनिधिक संस्था ह्या नात्यानें प्रांतिक इन्स्टिटयूटचें स्थान अलीकडे डळमळित झालें आहे. जिल्हानिहाय बोर्ड्स ऑफ सुपरव्हाइजिंग यूनिअन्स स्वतंत्र रीतीनें रजिस्टर झाल्यानें इन्स्टिटयूटच्या जिल्हाशाखांचें महत्त्व नाहींसें झालें आहे. व्यापक उद्देश व कार्यक्रम असलेले हें बोर्ड निर्माण झाल्यानें इन्स्टिटयूटचें कार्य मर्यादित झाल्यासारखें होणें अपरिहार्य होतें. वास्तविक रीतीनें, लोकशासित सहकारी संस्थांचें मध्यवर्ती मंडळ ह्या त्याच्या दर्जास अनुसरून प्रांतिक इन्स्टिटयूटचें कार्यक्षेत्र कितीतरी विस्तृत असलें पाहिजे आणि ह्या उच्च ध्येयानुसार त्याची वाढ कित्येक वर्षें होत आलीहि. परंतु सहकारी संस्थांचा कायदा व नियम ह्या विषयींचा अधिकार सहकारी खात्याच्या हातांत, ऑडिटचें कामहि खात्यानेंच करावयाचें आणि आतां सुपरव्हिजन नवीन जिल्हा बोर्डाच्या कक्षेंत जाऊन हीं बोर्डें संपन्न, प्रबळ व स्वतंत्र बनून त्यांचें कार्यक्षेत्र विस्तृत झालेलें. अशा स्थितींत इन्स्टिटयूटच्या शाखांकडे व मध्यवर्ती कचेरीकडेहि, मर्यादित कक्षेंतलें शिक्षण व प्रचार ह्यांवांचून कांहींच काम उरलें नाहीं असें दिसूं लागलें; आणि शिक्षण आणि प्रचार देखील जिल्हा बोर्डांनीं करावयास काय हरकत आहे ? असें वाटण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली. वर म्हटल्याप्रमाणें, खरें पहातां, नवीन संस्था निर्माण करणें, जुन्यांची सुधारणा व विस्तार करणें, लोकमत सहकारास अनुकूल करून घेणें, आर्थिक चौकशी करणें, सहकारी धोरणाचा विचार व निर्णय करणें इत्यादि सर्वसाधारण आर्थिक हिताचीं व प्रगतीचीं कामें जिल्हा शाखांचे मार्फत प्रांतिक इन्स्टिटयूटला करतां येतील. तीं सरकार किंवा सुपरव्हिजन बोर्ड्स ह्यांस करणें सोपें नाहीं. पण प्रगतीच्या ह्या दिशेनें इन्स्टिटयूट अलीकडे गेलेलें नाहीं, हें खरें आहे. मध्यवर्ती बँकांची स्वतंत्र संघटना व परिषद् असल्यानें तर शिक्षण व मर्यादित प्रचार एवढेंच काम त्याकडे उरलें आणि मध्यवर्ती प्रातिनिधिक मंडळ म्हणून त्याचें कार्य, वजन व अधिकार हीं हळुहळु संपुष्टांत आलीं. प्रांतिक प्रधान मंडळानें नुकत्याच करवलेल्या चौकशींत ही गोष्ट स्पष्ट झाली आणि त्या वस्तुस्थितीस धरून नियमांचें व संघटनेचें स्वरूप बदलावयाचें एवढाच कार्यभाग शिल्लक राहिला. प्रांतिक इन्स्टिटयूट ही केवळ शिक्षण संस्था म्हणून रहावी; तिच्या शाखांचे प्रॉपॅगँडा ऑफिसर्स शिक्षणाची देखरेख करणारे अधिकारी व्हावे आणि तिच्या शाखा ह्या बोर्ड्स ऑफ सुपरव्हायझिंग यूनिअन्सच्या कमिट्या बनाव्या अशा प्रकारची योजना सरकारकडून आलेली आहे. तिचा विचार इन्स्टिटयूटच्या कौन्सिलनें कार्यकारी मंडळाकडे सोपविला असून ह्या प्रश्नाचा निकाल लवकरच व्हावयाचा आहे.

प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटची घटना व कार्यक्षेत्र ह्यांचे संबंधांत सरकारनें सुचवलेली योजना अशी आहे:—सहकारी शिक्षणाबाबत तजवीज करणारी मध्यवर्ती संस्था असें तिचें स्वरूप मुख्यत्वेंकरून रहावें. तथापि, तिचें क्षेत्र मर्यादित केलें जाऊं नये ह्या लोकांच्या टीकेस अनुलक्षून सरकारनें अशी सवलत ठेवली आहे कीं, निरनिराळ्या प्रश्नांविषयींचें सहकारी जनतेचें मत अजमावून तें योग्य अधिकाऱ्यांस इन्स्टिटयूटनें कळवण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें, चळवळीचा वार्षिक आढावा घेऊन तिच्या प्रगतीप्रीत्यर्थ सरकारास दरवर्षी एकदा सूचना करण्यासहि त्यास मुभा आहे. प्रतिनिधींची वार्षिक सभा आज भरते आणि इन्स्टिटयूट अनेक प्रश्नांची चर्चा करून सरकारकडे त्या संबंधानें तक्रारी नेतें, त्या कार्यक्रमास बाध येऊं नये ह्या लोकांच्या ओरडीचें ह्याप्रमाणें समाधान करण्यांत आलें आहे.

इन्स्टिटयूटच्या सर्वव्यापीपणास मात्र सरकारनें स्पष्ट मर्यादा घातली आहे. आज कोणत्याहि सहकारी संस्थेस व व्यक्तीस इन्स्टिटयूटचे सभासद होतां येतें आणि सर्वसाधारण सभांस उपस्थित होऊन मत देतां येतें. जिल्ह्यांचीं सुपरव्हिजन बोर्ड्स आणि रजिस्टर झालेल्या सहकारी फेडरेशन्स (ह्यांमध्यें सुपरव्हायजिंग यूनिअन्स व शेतकी पतपेढ्या ह्यांचा अंतर्भाव होत नाहीं) हेच ह्यापुढें इन्स्टिटयूटचे घटक रहातील व त्यांपैकीं प्रत्येकास सर्वसाधारण सभेंत जाऊन आपल्या वतीनें मत देण्यास एकच इसमास पाठवतां येईल. आपलें शिक्षणाचें मुख्य कर्तव्य करण्यास इन्स्टिटयूटनें एक शिक्षण कमिटी नेमावयाची आहे, तिचे नऊ सभासद असतील. त्यांपैकीं चार वर निर्दिष्ट केलेल्या घटकांच्या प्रतिनिधींनीं निवडावयाचे असून एक, एक प्रत्येकीं सेंट्रल बँक्स व अर्बन बँक्स ह्यांनीं निवडावयाचा आहे. बाकी उरलेल्या तिघांपैकीं एक सरकारनियुक्त, एक खुद्द रजिस्ट्रार व एक ह्या सर्वांनीं मिळून निवडलेला असेल. ह्या कमिटीनें आपला अध्यक्ष व चिटनवीस निवडावयाचा असून हेच गृहस्थ अनुक्रमें इन्स्टिटयूटचे अध्यक्ष व चिटनवीस होतील.

वर सांगितलेल्या नऊ सभासदांस उच्च शिक्षणाची, विद्यापीठाच्या पदवीची किंवा वाङ्मयात्मक पात्रता असली पाहिजे असा निर्बंध आहे. इन्स्टिटयूटचें प्रमुख काम शिक्षणाचें असल्यानें ह्या प्रकारच्या उच्च शैक्षणिक दर्जाची मर्यादा पात्रतेस घालण्यांत आली आहे. शिक्षण-कमिटीस आपलें कार्य जिल्हानिहाय करतां यावें म्हणून तिनें इन्स्पेक्टर्स नेमावयाचे आहेत आणि ते सध्याच्या प्रॉपॅगँडा ऑफिसर्सच्या जागा घेतील. जिल्ह्यांतल्या बोर्ड्स ऑफ सुपरव्हायजिंग यूनिअन्सचा इन्स्टिटयूटच्या कार्याशी संबंध यावा म्हणून त्या बोर्डाच्या शिक्षण-कमिट्या नेमल्या जातील. त्यांच्या चिटन-

र्वासांचें काम वरील जिल्हा इन्स्पेक्टर्सनीं करावें अशी योजना आहे. सुपरव्हिजन बोर्डाच्या शिक्षण-कमिटीच्या सध्याच्या जिल्हा इन्स्टिट्यूटच्या (म्हणजे प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या जिल्हा शाखांच्या) जागीं येतील. इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सभेंत मामुली कामें आणि शिक्षण कमिटीच्या कार्याची चर्चा होऊन त्यासंबंधांत सूचना करतां येतील.

---

## हिंदुस्थानांतील विम्याचा धंदा

हिंदुस्थानांत विम्याचा प्रसार अलीकडे शीघ्र गतीनें होऊं लागला आहे. विम्याचा धंदा सुनियंत्रित करण्याकरितां मध्यवर्ती कायदेमंडळापुढें एक बिल सरकारतर्फे मांडण्यांत आलें, तें चालू बैठकींत पास होऊन त्यास कायद्याचें स्वरूप मिळेल. विमाविषयक प्रगतीचे सर्वांत ताजे उपलब्ध आकडे १९३५ सालासंबंधाचे आहेत, त्यांवरून ह्या धंद्याच्या प्रगतीची कल्पना येईल. विम्याचा प्रसार होण्यास अद्याप पुष्कळ वाव आहे व विमा कंपन्यांमार्फत तें कार्य चालू आहे. नव्या विमा कायद्यामुळें हा धंदा भक्कम पायावर स्थापित होऊन लोकहिताची जोपासना चांगली होईल, अशी अपेक्षा आहे. गेल्या दोन वर्षांत विमा मंडळयांचा पुष्कळ विस्तार झालेला आहे. तथापि, त्यांचेविषयींची संकलित व विश्वसनीय माहिती सरकारकडून प्रसिद्ध होते, ती आतां १९३५ सालाबाबत नुकतीच उपलब्ध झाली आहे.

### हिंदी विमा कंपन्या

सन १९३५ मध्यें हिंदुस्थानांत एकूण ३८१ विमा कंपन्या काम करीत होत्या, त्यांपैकी २३४ हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या व १७४ विदेशी होत्या. हिंदी कंपन्यांची प्रांतवार वाटणी खाली दिल्याप्रमाणें होती:—

मुंबई-६६, बंगाल-४८, मद्रास-४०, पुंजाब-३०, सिंध-११, दिल्ली-१०, संयुक्तप्रांत-१२, बिहार-४, मध्यप्रांत-५, अजमीर मारवाड-३, ब्रम्हदेश व आसाम-प्रत्येकीं २, सरहद्द प्रांत-१. विदेशी कंपन्यांपैकी ६९ ब्रिटिश व २९ साम्राज्यांतर्गत इतर देशांतील होत्या; हिंदी कंपन्यांपैकी १८३ कंपन्या आयुर्विम्याचा धंदा करीत होत्या; ह्या उलट, बहुसंख्य विदेशी कंपन्या (१२३) इतर प्रकारच्या विम्याचेंच काम करीत होत्या. अहवालाचे मुदतींत २० नवीन हिंदी विमा कंपन्या स्थापन झाल्या.

### इतर प्रकारच्या विम्याचें उत्पन्न

आग, आगबोटींतील वहातूक, इत्यादि बाबतच्या विम्याचे क्षेत्रांत हिंदी कंपन्यांची प्रगति विशेष झालेली नाहीं. आगीच्या विम्याचें उत्पन्न १ कोटि, ४२ लक्ष रु. झालें, त्यापैकी हिंदी कंपन्यांच्या वाटणीस फक्त ३१ लक्ष रु. आले. 'मरीन' इन्शुअरन्सच्या एकूण ४६ लाखांच्या उत्पन्नापैकी ३७½ लक्ष रुपये विदेशी कंपन्यांकडे गेले. इतर विम्याच्या उत्पन्नाचे बाबतहि हीच परिस्थिति आढळते. विदेशी कंपन्यांत अर्थात्‌च ब्रिटिश कंपन्यांचें प्राधान्य आहे.

### हिंदी कंपन्यांची जिंदगी

हिंदी विमा कंपन्यांची जिंदगी १९३५ अखेर ४४¼ कोटि रुपयांची होती. त्यापैकी ३०½ कोटि रु. मंडळयांचे भागांत व सरकारी रोख्यांत गुंतविलेले होते आणि गहाणावर व पॉलिसींचे आणि रोख्यांचे तारणावर ६½ कोटि रु. दिलेले होते.

### आयुर्विम्याची प्रगति

आयुर्विम्याचा प्रसार हिंदुस्थानांत कसा होत आहे, हें खालील कोष्टकावरून ध्यानांत येईल:—

| वर्ष | वर्षातील नवीन काम (रु.) कोटि, लक्ष | वर्षअखेर चालू काम (रु.) कोटि | कंपन्यांचें वार्षिक उत्पन्न (रु.) कोटि, लक्ष |
|---|---|---|---|
| १९२६ | १०,३५ | ५३ | ३,३२ |
| १९२९ | १७,२९ | ८२ | ४,९२ |
| १९३२ | १९,६६ | १०६ | ६,८८ |
| १९३५ | ३२,८१ | १५२ | ९,३३ |

### अनामत ठेवींचा तपशील

हिंदी कंपन्यांनीं कंट्रोलर ऑफ करन्सीकडे अनामत ठेवलेल्या रकमेचा तपशील खाली दिला आहे:—

| रोखे | दर्शनी किंमत लक्ष रु. |
|---|---|
| २¾% | २¼ |
| ३% | ४९¼ |
| ३½% | ७७ |
| ४% | २२½ |
| ४% पेक्षां जास्त दराचे | २१½ |
| पो. ऑ. कॅश सर्टिफिकिटें | १½ |
| | १७३¾ |

### कंपन्यांस पडलेला व्याजाचा दर

दिवसानुदिवस हिंदी कंपन्यांस पडलेल्या व्याजाचे दरांत उतार होत आला आहे, हें पुढील आकड्यांवरून स्पष्ट होईल:—

| वर्ष | १९३१ | १९३२ | १९३३ | १९३४ | १९३५ |
|---|---|---|---|---|---|
| व्याजाजा दर | ५·४२ | ५·३८ | ५·१७ | ५·०८ | ४·९३ |

### पोस्ट ऑफिस इन्शुअरन्स फंड

पोस्ट खात्यांतील नोकर वर्गासाठी ह्या फंडाची योजना हिंदुस्थान सरकारनें सन १८८३ सालीं आंखली व हळुहळु सर्व प्रकारच्या सरकारी नोकरांसहि ह्या फंडामार्फत विम्याची व्यवस्था करण्याची सवलत मिळाली. १९३४, १९३५ व १९३६ ह्या वर्षातील व्यवहारांविषयींची माहिती खालील कोष्टकांत सापडेल:-

| वर्ष | वर्षातील नवीन काम पॉलिसी (संख्या) | रकम (लक्ष रु.) | एकूण चालू काम रकम (लक्ष रु.) | विमा खातीं फंड (लक्ष रु.) |
|---|---|---|---|---|
| १९३४ | ५,२९२ | १०६ | १,७३६ | ५,९४ |
| १९३५ | ४,८३२ | १०४ | १,७८९ | ६,४१ |
| १९३६ | ५,४८९ | ११९ | १,८५७ | ६,९३ |

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाउस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## स्फुट विचार

### मुंबईमध्यें दुसरी स्टॉक एक्सचेंज

मुंबई शहरांत रोखे बाजाराची एक जुनी संस्था अस्तित्वांत असून तिचे नियम व कार्यपद्धति ह्यांविषयीं अलीकडे पुष्कळ टीका व चर्चा झालेली आहे. अशा परिस्थितींत एकाच शहरामध्यें दुसरी स्टॉक एक्सचेंज कशाला हवी ! असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. सरकारी व निमसरकारी रोखे आणि कंपन्यांचे भाग ह्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होण्यास जुनी संस्था अपुरी पडते किंवा नव्या संस्थेमध्यें कांहीं नवीन विशिष्ट व्यवहारपद्धति अंगिकारण्यांत येत आहे ह्यांपैकी कोणतें तरी एक कारण किंवा दोन्हीं कारणें "इंडिअन स्टॉक एक्सचेंज"च्या स्थापनेच्या मुळाशी असलीं पाहिजेत हें उघड आहे. गेल्या आठवड्यांत ही नूतन संस्था चालू करण्यांत आली तेव्हां तिचे अध्यक्ष, श्री. चुनीलाल बी. मेथा, ह्यांनीं न्यूयॉर्क, शांघाय व कलकत्ता ह्या शहरांत दोन स्टॉक एक्सचेंजेस असल्याचा दाखला दिला. रोखे किंवा भाग खरेदी करण्याचा करार झाल्यावर योग्य वेळीं पैसे भरून ते ताब्यांत घेण्याचें महत्त्व आपण लोकांच्या मनावर ठसविणार असून "बदल्या"चे खर्चिक व्यवहार करणें बरें नाहीं ही गोष्ट त्यांस आपण पटवून देणार आहोंत असें त्यांनीं सांगितलें. तथापि, नवीन स्टॉक एक्सचेंजमध्यें तूर्त वायद्याचे व्यवहार होणार नाहींत आणि कराराप्रमाणें रोखे दिले-घेतले जावयाचे आहेत. सिक्यूरिटीजबाबतच्या कायद्यांत मात्र असल्या व्यवहारांस आडकाठी नाहीं. जुन्या स्टॉक एक्सचेंजच्या व्यवस्थापक मंडळानें व्यवहार पद्धतीच्या सुधारणेच्या प्रश्नाची चर्चा चालवली असून त्यासंबंधानें कांहीं योजनाहि आखली आहे. आठ कंपन्यांचे भाग वायद्याच्या यादीमधून काढून टाकण्यांत आले आहेत आणि त्यांचा अंतर्भाव हजर व्यवहाराचे यादींत केलेला आहे.

---

### दोन रोखेबाजार कशाला ?

एकाच शहरांत दोन रोखे बाजार कशाला ? ह्या प्रश्नाचें उत्तर म्हणून, नवीन स्टॉक एक्सचेंज पैसे गुंतविणारांचें हितसंबंध सुरक्षित रहावे ह्याकरितां विशेष यत्न करील, असें तिचे प्रमुख उत्पादक व संचालक, श्री. मेथा, यांनीं सांगितलें आहे. संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांची संख्या सपाट्यानें वाढत आहे, तेव्हां सर्व तऱ्हेच्या भागांची खरेदी-विक्री करण्याची सोय उपलब्ध होणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. ह्या रोखेबाजारांतील व्यवहार कांहीं विशिष्ट लोकांचेच हातीं जाणार नसून, ज्यांचे जवळ चार पैसे आहेत व धंदा करण्याची ज्यांस अक्कल आहे, अशा सर्वांस तेथें मुभा आहे. लहान असामींना खरेदलेल्या रोख्यांचें तारणावर अल्प दरानें रकम उभारण्याचें समजत नाहीं व ते आपली खरेदी पुढें ढकलण्यासाठी बदल्यांचे भानगडींत पडतात आणि भारी दरानें व्याज भरतात. हा नुकसानीचा व्यवहार आवश्यक नाहीं हें लोकांच्या नजरेस आणण्याचा स्टॉक एक्सचेंजचा बेत आहे. भागांची किंमत प्रत्यक्ष व्यापार व उद्योगधंदे ह्यांतील चढउताराबरोबर वरखाली जाणें सहाजीक असलें तरी हे हेलकावे सट्टेवाल्यांनीं मुद्दाम जाणूनबुजून घडवून आणलेले नसणें इष्ट आहे. विक्रेता व खरेदीदार हे दोघेहि खरोखरच व्यवहार करण्यास आतुर असले पाहिजेत, हें उच्च ध्येय समोर ठेवणें जरूर आहे, असें श्री. मेथा ह्यांनीं सुचविलें. कलकत्ता, मद्रास, दिल्ली, येथील कंपन्यांच्या भागांचे व्यवहारहि नव्या एक्सचेंजमध्यें होणार आहेत. वायद्याचे करार तिला करण्यास परवानगी मिळावी, असा अर्ज एक्सचेंज लवकरच सरकारकडे पाठविणार आहे. वर नमूद केलेले हेतु ह्या नव्या संस्थेनें कितपत साध्य होतात, हें लवकरच दिसेल.

---

### महाराष्ट्र अर्बन बँक्स अँड सोसायटीज यूनियन

महाराष्ट्र अर्बन बँक्स आणि अर्बन सोसायट्या ह्यांची परिषद् सातारा येथें दीड वर्षामागें भरली होती, तीमध्यें सातारा, पुणें, नगर व सोलापूर ह्या चार जिल्ह्यांतील अर्बन बँक्स व अर्बन सोसायटीज ह्यांचा एक संघ स्थापन करावा असा एक ठराव पास होऊन त्याबाबत जरूर ती तजवीज करण्यासाठी एक स्वतंत्र कमिटी नेमण्यांत आली होती. तिनें आपल्या सभा भरवून त्यांत नियोजित संघाबाबत घटना व नियम ह्यांचा एक मसुदा तयार केला. ही योजना सर्व अर्बन बँक्स व सोसायटीज यांचेकडे पाठवून तिच्याविषयींच्या सूचना व सर्वसाधारण मान्यता मागवावी असें ठरलें. त्याप्रमाणें हें कार्य पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें हातीं घेतलें असून त्या संस्थेचे उत्साही कार्यवाह, श्री. देवधानकर, ह्यांनीं हितसंबंधी सर्व बँकांस व सोसायट्यांस पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें त्यांचेकडे लवकर गेल्यास यूनियनच्या स्थापनेचा प्रश्न कित्येक महिने लोंबकळत पडला आहे त्याचा निकाल लागण्यास सहाय होईल. अर्बन बँकांच्या संघटनेचें महत्त्व अलीकडे तर विशेषच वाढलें असल्यानें सर्व बँक्स व अर्बन सोसायटीज तिकडे आस्थापूर्वक लक्ष पुरवतील अशी आशा आहे.

---

### "जीवनांत पैशाचें स्थान"—प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान.

येथील कन्या-शिक्षक मंडळाच्या विद्यमानें गेल्या शनिवारीं "जीवनांत पैशाचें स्थान" ह्या विषयावर सरदार रास्ते यांच्या वाड्यांत प्रॅक्टिसिंग स्कूलमध्यें प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान झालें. पैसा म्हणजे काय, त्याचा सदुपयोग व दुरुपयोग कसा होऊं शकतो, प्राप्तीच्या मानानें खर्च मर्यादित ठेवून बचत करण्याचें महत्त्व किती आहे आणि आर्थिक विषयांचें ज्ञान स्त्रियांमध्यें प्रसृत होण्याची आवश्यकता केवढी मोठी आहे इत्यादि मुद्यांचें विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत व सुलभ रीतीनें व्याख्यात्यांनीं केलें. समाजाचा व राष्ट्रांचा अभ्युदय उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेवर अवलंबून असतो व त्यासाठी भांडवल लागतें. तें व्यक्तींनीं केलेल्या बचतीमधून उत्पन्न होतें. ह्याकरितां प्रत्येक पुरुषानें व स्त्रीनें काटकसर करण्याची संवय स्वतःस लावून घ्यावी. ह्या गोष्टीचें विशेष महत्त्व स्त्रियांस असल्यानें त्यांनीं पोस्टल सेव्हिंग्ज बँकेसारख्या ठिकाणीं आपला पैसा सुरक्षित रीतीनें ठेवून स्वतःची फसगत होणार नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. आर्थिक विषयांची माहिती समाजास व तरुण पिढीस करून देण्याची व त्यांस चांगल्या संवयी लावण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. स्त्री शिक्षकांनीं ह्या बाबतींतली आपली जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडली पाहिजे. स्त्रियांच्या प्रगतीवर समाजाची व राष्ट्राची प्रगति अवलंबून आहे. स्त्री शिक्षकांनीं आपलें कर्तव्य नीट करावें, असें प्रो. काळे ह्यांनीं कळकळीनें सांगितलें.

---

## गोसंवर्धनाचें महत्त्व

### महात्माजींचा पाठिंबा

हरिपुरा येथील गोप्रदर्शनाचें उद्घाटन महात्मा गांधींचे हस्तें ता. १३ रोजीं झालें, त्यावेळीं सर्व गाई तापी नदीच्या पाण्यानें स्वच्छ धुवून त्यांचीं शिंगें विविध रंगांनीं सजवलीं होतीं. महात्माजी आपल्या भाषणांत म्हणाले:—"ऐतिहासिक व आर्थिक ह्या दोन्ही कारणांसाठीं गोवर्धन केलें पाहिजे. आपल्या निष्काळजीपणामुळें, आळसामुळें व अज्ञानामुळें चांगल्या गाईच्या जाती दुर्मिळ झाल्या आहेत. पुरातन काळीं राजे लोकांस 'गोपालदास' म्हणवून घेण्यांत भूषण वाटत असे. सध्या गाईचें जतन करण्याचा मुळींच यत्न केला जात नाहीं व त्या कारणानें आर्थिकदृष्ट्या त्या डोईजड वाटतात. सर्वांनीं गोदुग्ध सेवन करण्याचें ठरविल्यास गोसंवर्धन आपोआप होईल. गाई मारणें हा कसायाचा धंदा आहे; त्यास दोष देऊन काय उपयोग!"

## हिंदी रेल्वेजच्या बजेटांत वाढावा

### मध्यवर्ती सरकारास २¾ कोटि रु. मिळणार

हिंदी रेल्वेजचें येत्या वर्षाविषयींचें अंदाजपत्रक सोमवार, ता. १४ रोजीं मध्यवर्ती कायदेमंडळांस सादर करण्यांत आलें. १९३७-३८ अखेरच्या वर्षी रेल्वेजच्या हिशेबांत १५ लाखांचा वाढावा आढळून येईल, अशी कल्पना होती; परंतु २ कोटि, ८३ लक्ष रुपयांचा वाढावा उरेल, असा आतां अंदाज आहे. १९३८-३९ सालीं रेल्वेजच्या व्यवहारांत २ कोटि, ५६ लक्ष रुपये नफा राहील, अशी अपेक्षा आहे. चालू वर्षअखेर उरणारा २¾ कोटींचा अपेक्षित वाढावा मध्यवर्ती बजेटांत जमा केला जाईल. रेल्वेजनीं शिलकी निधींतून मागें केलेली उचल परत करण्याचें कारण नाहीं, असें गेल्या वर्षी ठरल्यामुळें रेल्वेजना मध्यवर्ती सरकारास एवढी रकम देणें शक्य होत आहे. १९३८-३९ सालीं आगगाड्यांच्या रस्त्यांवर, पुलांवर, इमारतींवर व डब्यांच्या खरेदीवर १२¾ कोटि रुपयांचा भांडवली खर्च व्हावयाचा आहे. २,८०० नव्या वाघिणी खरेदण्याची बजेटांत तरतूद आहे. रेल्वेजचें पुढच्या वर्षाचें अंदाजपत्रक चालू सालाच्या प्रत्यक्ष आलेल्या अनुभवावर आधारलेलें आहे. ह्यामुळें त्यांत चालू साला इतकेंच निवळ उत्पन्न गृहीत धरलें आहे.

### गिरणी कामगारांचे मजुरींत वाढ होणार ?

कापड गिरण्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या मजुरीच्या दरांविषयीं चौकशी व जरूर त्या सूचना करण्यासाठीं मुंबई सरकारनें ऑक्टोबर, १९३७ मध्यें एक कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. कमिटीच्या अखेरच्या शिफारसी जाहीर होण्यास अद्याप थोडा अवधी आहे. कापडाच्या धंद्यांतील नफ्याचें प्रमाण वाढलें आहे, तथापि मजुरीचे दरांत मात्र घट झाली आहे, असा कमिटीचा अभिप्राय आहे. मंदी दूर झाली असल्यानें, मजुरींत वाढ होणें आवश्यक आहे, असें सांगून कमिटीनें त्याबाबत सूचना केल्या आहेत.


औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.
( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )
हेड ऑफिस—औंध ( सातारा )
शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.



न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई
( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—
(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )



स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

### मुंबईमध्यें नवीन बँकेची स्थापना

श्री. जमनादास मेहता, श्री. ल. ब. भोपटकर, ना. पी. बी. गोळे, श्री. ग. स. मराठे, रा. ब. एन. बी. देशमूख, श्री. भगवानदास मु. गोकुळदास, फाझलभाय लि. चे मि. महंमद अ. अ. फाझलभॉय, गरवारे मोटर्सचे श्री. बी. डी. गरवारे, धूतपापेश्वरचे श्री. जी. व्ही. पुराणिक, मि. मेअर निस्सीम व श्री. डी. डी. देशपांडे ह्या संचालक मंडळाचे नेतृत्वाखाली वरील बँकेची स्थापना करण्यांत आली आहे. प्रारंभीं ही बँक व्यापारी बँकिंगचाच व्यवहार करणार असली, तरी पुढें औद्योगिक व्यवहाराकडेहि ती वळणार आहे. मुंबईसारख्या शहरांतून बँकिंगचा मोठा प्रसार झाला असला, तरी देशाच्या अंतर्गत भागांत बँकांची मोठी उणीव भासत आहे. "बँक ऑफ महाराष्ट्र" चें उद्घाटन करतेवेळीं कै. सर सोराबजी पोचखनवाला ह्यांनीं ह्या परिस्थितीकडे लक्ष वेधलें होतें. रिझर्व्ह बँकेच्या पत्रकांतूनहि तीच गोष्ट प्रतिपादण्यांत आली आहे. न्यू सिटिझन बँक, मुंबई शहर व शहराबाहेरील प्रदेश ह्यांमधील बँकिंगची सांगड घालणार आहे. मुंबई इलाखा ह्या दृष्टीनें मागसलेला असल्यानें, प्रस्तुत उपक्रमाचें महत्त्व विशेष आहे. खुद्द मुंबई शहरांतील विदेशी एक्सचेंज बँकांमध्यें हिंदी लोकांच्या प्रचंड ठेवी आहेत. त्यांचा ओघ हिंदी संस्थांकडे वळणें आवश्यक आहे. देशी बँकांस अद्याप ही गोष्ट साधलेली नाहीं. ह्या नवीन बँकेनें सदरहु उणीव भरून काढण्याचा मार्ग मोकळा केल्यास तिची ही एक भरीव कामगिरी होईल.

### पद्धतशीर व सुरक्षित व्यवहार

१९३६ च्या इंडियन कंपनी ॲक्टानें हिंदुस्थानांतील बँकिंगचा धंदा नियमबद्ध करून टाकला आहे व त्यामुळें रिझर्व्ह बँक व मंडळ्यांचे रजिस्ट्रार ह्यांच्या प्रभावी नियंत्रणाखाली बँकांस व्यवहार करावा लागणार आहे. भागीदार व ठेवीदार ह्यांच्या हितसंबंधांचें संरक्षण आतां कायद्यानें निश्चित झालें असून बँकिंगचा धंदा बिनधोक झाला आहे. बँकिंगखेरीज इतर व्यवहार करण्यास प्रतिबंध, मॅनेजिंग एजन्सीचें उच्चाटन, भरपूर भांडवलाची आवश्यकता, वसूल न केलेलें भांडवल गहाण टाकण्यास मज्जाव, पुरेसा रिझर्व्ह फंड राहील अशी तरतूद, ठराविक प्रमाणांत रोख शिलका राखण्याविषयीं कडक नियम, इत्यादि अनेक निर्बंध बँकांस पाळावे लागणार आहेत. न्यू सिटिझन बँकेचा व्यवहार पद्धतशीर रीतीनें सुरक्षितपणें चालेल ह्याविषयींचा विश्वास तिच्या चालकांचीं नांवें पाहिलीं असतां दृढ होईल.

### बँकेचे विशेष

बँकेचे विशेष म्हणून खालील योजनांचा उल्लेख करतां येण्याजोगा आहे:—(१) बँकेकडील ठेवी हा संस्थेच्या व्यवहाराचा पाया असल्यानें, ठेवीदारांच्या हितसंबंधांवर लक्ष ठेवण्याकरितां ठेवीदारांचे प्रतिनिधि संचालक मंडळावर घेण्याचें ठरलें आहे. (२) मुंबईबाहेर बँकिंगचा प्रसार करण्याच्या बँकेचे धोरणास अनुसरून, तिच्या बोर्डावर मुंबई बाहेरील डायरेक्टर घेण्यांत यावयाचे आहेत. मध्यवर्ती बँकिंग कमिटीनें ह्या स्वरूपाची सूचना केली होती, ती प्रस्तुत बँक अंमलांत आणीत आहे. (३) शिक्षण संस्था व बँका ह्यांमध्यें सध्या सहकार्याचा पूर्ण अभाव आहे. लायक तरुणांस बँकिंगचे धंद्याकडे वळविण्याचा सिटिझन बँक यत्न करील व त्यांच्या शिक्षणास व्यावहारिक वळण लावील. (४) बँकेचे हिशेब दर पंधरवड्यानें अगर वेळोवेळ प्रसिद्ध केले जातील, इ.

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., एफ. सी. आर. ए. (ग्लासगो) हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. देशपांडे हे पुणें येथील सुप्रसिद्ध कॉमनवेल्थ विमा कंपनीचे प्रारंभापासून आठ वर्षें फिनॅन्स सेक्रेटरी व एक मॅनेजिंग एजंट होते व सदरहु कंपनीच्या यशस्वितेस त्यांचें बहुमोल सहाय झालेलें आहे. त्यांचा ह्या व्यवसायांतील दीर्घकालीन अनुभव व बोर्डाची प्रत्यक्ष देखरेख हीं बँकेचा कारभार किफायतशीर चालेल, असें निःसंशयपणें सुचवितात. श्री. देशपांडे ह्यांची पात्रता, अनुभव, निरलसपणा, मनमिळाऊ स्वभाव व चिकाटी ह्यांचा फायदा बँकेस मिळणार आहे.

न्यू सिटिझन बँकेची स्थापना करण्यांत चालकांचा हेतु केवळ आणखी एक बँक चालू करणें, हा नसून लोकांस बँकिंगचें महत्त्व पटवून देऊन त्यांच्या बँकिंगविषयक गरजा भागवणें हें तिचें उद्दिष्ट आहे. बँकेच्या संचालक मंडळांत अनुभवी, वाकब व वजनदार लोक आहेत; तेव्हां बँकेस लवकरच पुरेसें काम मिळण्यास अडचण भासणार नाहीं आणि भागीदारांच्या भांडवलावर समाधानकारक व्याज सुटेल, अशी अपेक्षा आहे. निरनिराळ्या तीन प्रकारांच्या भागांपैकी पसंत पडेल ते भाग खरेदी करण्याची सोय बँकेनें ठेवली आहे. ५ टक्क्यांचे क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भाग, ऑर्डिनरी भाग व डिफर्ड भाग ह्यांपैकीं कोणतेहि भाग घेतां येतील. दोन लक्ष रुपयांच्या दर्शनी किंमतीचे भाग अगोदरच खपले आहेत. न्यू सिटिझन बँक ही लवकरच शेड्यूल्ड बँकांच्या यादींत जाऊन तिला उत्कृष्ट यश लाभेल, अशी आम्हांस आशा आहे


## AUCTION NOTICE

Used but Serviceable surplus Tools as shown below will be sold by Public Auction to the highest bidder subject to the approval of the Superintending Engineer, Deccan Irrigation Circle, Poona, by the Assistant Engineer, I/C Ahmednagar Sub-Division, Ahmednagar, in the Executive Engineer's Stores at Ahmednagar on Wednesday the 23rd February 1938, commencing at 3 P. M. The tools may be seen at the Executive Engineer's Stores during working hours. The tools will be marked as sold and handed over to the purchaser.

**Terms Strictly Cash**

| | Nos. |
|---|---|
| (1) Phavras or Mamooties ... ... | 3000 |
| (2) Bars mining steel about 1½' to 3' lengths ... ... | 1300 |
| (3) Hammers Sutkies of sizes ... ... | 100 |
| (4) Hammers Stone breaking of sizes ... ... ... | 43000 |

Sd/-R. G. ISLUR, B. S. E.
Executive Engineer,
Ahmednagar Division.

### फलटण श्रीलक्ष्मी सें. को. बँक, लि.

( वार्षिक सभा:५-२-३८ )

वरील बँकेचें वसूल झालेलें भांडवल ५९,५०० रु. असून रिझर्व्ह फंड २६½ हजार रु., बिल्डिंग फंड १६½ हजार रु., डिव्हिडंड ई. फंड ४½ हजार रु. व बॅड डेट रिझर्व्ह फंड १०½ हजार रु. आहे. बँकेकडील एकूण ठेवी ४½ लक्ष रुपयांच्या आहेत. १९३६-३७ मध्यें बँकेनें सोमायट्यांस ४५½ हजार रुपयांचें कर्ज दिलें व वसूल ५७½ हजार रु. आला. वसूल कमी येण्याचें कारण दुष्काळी परिस्थिति, हें होय. व्यक्तिशः सभासदांकडे ७७५ रु. येणें आहे. सोनें, चांदी, धान्य, व्यापारी माल, इत्यादींचे तारणावर बँकेकडून कर्ज मिळण्याची सोय असूनहि तिचा फायदा सभासदांनीं विशेषसा घेतला नाहीं, असा अहवालांत उल्लेख आहे. अहवालाचे सालांत थकबाकी १९½ हजारांनीं वाढून ती २ लक्ष, ८ हजार इतकी झाली. दुकान-शाखा खातीं बँकेस १५ रु. ९ आ. ६ पै नफा झाला. ८,७४२ रु. नफ्यांतून भागीदारांस ६½ दरानें २,७०० रु. देण्याची डायरेक्टर बोर्डाची शिफारस होती. थकबाकीचें प्रमाण मोठें आहे आणि तें कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. बँकेचा कारभार प्रगतिपर असून बरे दिवस येतांच तिची परिस्थिति चांगली सुधारेल असा विश्वास वाटण्यास जागा आहे.

### " शुनः कपाले लगुडप्रहारः "

संपत्तीचें व आर्थिक सत्तेचें थोड्या लोकांच्या हातीं एकीकरण होण्याचे दुष्परिणाम अमेरिकेचे प्रेसिडेंट, मि. रूझव्हेल्ट, ह्यांच्या ध्यानांत येऊन ह्या प्रवृत्तीवर त्यांनीं शस्त्र उचललें आहे. एकाच धंद्यांतल्या अनेक मंडळ्यांच्या भांडवलाचे भाग खरेदी करून त्यांचा कारभार थोड्या धनिकांच्या हातीं एकवटण्यासाठी नवीन कंपनी स्थापन करतात तिला " होल्डिंग कंपनी " म्हणतात. आगगाड्या, ट्राम्स, विजेचे कारखाने अशांच्या अमेरिकन कंपन्यांतली ३,४७० कोटि रुपयांची मालमत्ता १६० कोटि रुपयांचें भांडवल ह्या रीतीनें होल्डिंग कंपन्यांत घालणाऱ्या व्यक्तींच्या ताब्यांत आली आहे. " हें ४ इंच लांबीचें शेपूट ९६ इंच लांबीच्या कुत्र्यास हालवीत आहे"; तेव्हां त्यास " शुनः कपाले लगुडप्रहारः " हाच न्याय लावला पाहिजे असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचें म्हणणें आहे. बड्या भांडवलवाल्यांस हें धोरण अत्यंत अप्रिय झालें आहे, हें सांगावयास नकोच.

### पूर्व खानदेश जिल्हा को. इन्स्टिट्यूट

वरील इन्स्टिट्यूटमार्फत जानेवारी, १९३८ मध्यें मेहूणबारे, चाळीसगांव, नगरदेवळा, पिंपळगांव बु. व भडगांव येथें पंच कमिटी वर्ग भरविण्यांत आले. चाळीसगांव येथील वर्गास १९५ सभासद् हजर होते. इतर ठिकाणीं हजेरीची सरासरी सुमारें १०० होती.

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्यावद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,

मॅनेजिंग एजंटस्,

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड

११ बुधवार पेठ, पुणें नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,२५,००० वसूल झालेलें भांडवल १,१२,४००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## अर्थशास्त्राचा अभ्यास–फर्ग्युसन कॉलेजांतील मंडळ

फर्ग्युसन कॉलेजच्या इतिहास-अर्थशास्त्र मंडळाची वार्षिक सभा व संमेलन हीं गेल्या शुक्रवारीं प्रो. काळे यांच्या अध्यक्षतेखालीं भरलीं होतीं. अहवालवाचन व चिटनवीसांची निवडणूक झाल्यावर अध्यक्षांनीं मंडळाचें विस्तृत कार्य व सभासदांचा दांडगा उत्साह यांबद्दल त्यांचें व सहकारी अध्यापक यांचें अभिनंदन केलें. अर्थशास्त्राचे सिद्धांत व आर्थिक व्यवहार ह्यांचे संबंधांत जगांत अलीकडे चाललेल्या घडामोडींचें सामान्य स्वरूप निदर्शनास आणून हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत योग्य असें आर्थिक धोरण निश्चित करण्याचें महत्व किती आहे ह्याची कल्पना प्रो. काळे यांनीं श्रोत्यांस दिली. अर्थशास्त्राचे सिद्धांत व त्यांचा प्रगतीच्या समाजकार्यासाठी उपयोग ह्या गोष्टी सध्याच्या बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळत्या करून घेणें अवघड असलें तरी तें अत्यंत अगत्याचें आहे हें व्याख्यात्यांनीं जर्मनी, इंग्लंड इत्यादि देशांत व खुद्द हिंदुस्थानांत चाललेल्या घडामोडीचे दाखले देऊन विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवलें. अर्थशास्त्र व राष्ट्रीय जीवन ह्यांची ताटातूट होणें अनिष्ट आहे आणि अर्थशास्त्रज्ञांनीं समाजापुढें येणाऱ्या प्रश्नांचा योग्य परामर्श घेऊन शास्त्रीय परंतु व्यावहारिक सल्ला दिला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. ते पुढें म्हणाले:— अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या हिंदी तरुणांनीं ह्या विषयाकडे अधिक लक्ष पुरवलें पाहिजे. शेतकरी-वर्गाचा कर्जबाजारीपणा, सावकारी व्यवहार, इत्यादि बाबींची चर्चा आपल्या इकडे सध्या चालली आहे. ह्यांसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचें मर्म विद्यार्थ्यांनीं समजून घेतलें पाहिजे. इतिहास-अर्थशास्त्रमंडळासारख्या संस्थांचा ह्या कामीं चांगला उपयोग होतो. फर्ग्युसन कॉलेजांतील मंडळानें आपलें कार्य उत्साहानें चालवून अनेक वर्षांची आपली उज्वल परंपरा कायम ठेवली असल्याबद्दल त्या मंडळाचे कायमचे अध्यक्ष या नात्यानें प्रो. काळे ह्यांनीं समाधान व्यक्त केलें.

## खादी व ग्रामोद्योग यांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन

हरिपुरा येथील विठ्ठलनगरामधील खादी व ग्रामोद्योगप्रदर्शनाचें उद्घाटन ता. १० फेब्रुवारी रोजीं महात्मा गांधी ह्यांनीं केलें. त्यापूर्वीं, सकाळीं, त्यांनीं प्रदर्शनांतील प्रत्येक दुकानास समक्ष भेट देऊन सर्व गोष्टींचें निरीक्षण केलें. "हिंदुस्थानांतील सात लक्ष खेडीं जगलीं पाहिजेत. त्यांस घासभर अन्न कसें मिळवितां येईल, हें प्रदर्शनापासून शिकतां यावें, अशी माझी मनापासूनची इच्छा आहे" असें महात्माजी म्हणाले. ग्रामोद्योगांकडे लोकांचें लक्ष वेधून देशाच्या आर्थिक प्रगतीचें खरें क्षेत्र त्यांचे नजरेसमोर आणण्याचें कार्यहि प्रदर्शनामुळें सुकर होईल. या प्रदर्शनाचा मुख्य हेतु गरिबांना उत्तेजन देणें हा असल्यानें प्रदर्शन हें आकर्षक वस्तूंचा बाजार झाला नसून लोकांस उद्योगधंद्यांचें शिक्षण देण्याचें तें साधन बनलें आहे. मुंबई, संयुक्त प्रांत, म्हैसूर, इंदूर, भावनगर, हैद्राबाद, बडोदें, इत्यादि प्रांतांच्या व संस्थानांच्या सरकारांनीं प्रदर्शनांत दुकानें घेतलीं आहेत. फैजपूर येथील प्रदर्शनापेक्षा प्रस्तुत प्रदर्शन तिप्पट मोठें आहे व त्यांत २०० स्टॉल्स आहेत.

## ब्रिटिश बँकेविषयीं उद्बोधक आकडे

ग्रेटब्रिटनमधील सुप्रसिद्ध बार्कलेज बँक लि. च्या अध्यक्षांनीं बँकेच्या गेल्या वार्षिक सभेचे प्रसंगीं त्या मंडळीच्या कारभाराविषयीं कांहीं मनोरंजक माहिती सांगितली. बँकेकडे १८ लक्ष, ५० हजार इतकीं खातीं असून १९३७ सालीं तिची पैशाची उलाढाल सुमारें १३० अब्ज रुपयांची झाली. प्रत्येक खात्यावर सरासरीनें ३ हजार रु. आहेत. नोव्हेंबर, १९३७ अखेर २,०९,२२८ लोकांनीं बँकेकडून कर्जे घेतलीं, त्यांची प्रत्येकी सरासरी ११ हजार रुपये पडली. त्यापूर्वींच्या वर्षीं ह्याच मुदतींत २,१५,६८८ कर्जे दिलीं गेलीं त्यांची प्रत्येकी सरासरी ११½ हजार रु. होती.

## फुलांचा किफायतशीर धंदा

ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल फुलें खपतात, त्यांची वार्षिक किंमत घाऊक दरानें १२ ते १३ कोटि रु. भरते. महायुद्धापूर्वींच्या काळांत फुलांचा धंदा अगदींच अल्प प्रमाणांत चालत असे. फुलझाडांच्या लागवडींत शास्त्रीय शोधांचा उपयोग केला गेल्यानें फुलांचें उत्पादन आतां हुकमी होऊं शकतें व त्यामुळें धंदाहि किफायतशीर होऊन इच्छेप्रमाणें फुलांचे हंगाम कमी-ज्यास्ती व पुढेंमागें करतां येतात. हजारो लोकांस ह्या धंद्यांत काम उपलब्ध झालें आहे.

## जननवार्ता जाहीर करण्यासाठी तोफांची सलामी

राजघराण्यांतील जननवार्ता जाहीर करण्याकरितां हॉलंडमध्यें तोफेचे आवाज काढण्यांत येतात. पुत्रप्राप्तीस १०१ तोफा, कन्याप्राप्तीस ५१ तोफा, जुळ्या मुली झाल्यास १०२ तोफा, मुलगा-मुलगी जुळीं असल्यास १५२ तोफा व जुळे मुलगे झाल्यास २०१ असें कोष्टक ठरलेलें आहे.

## नोकरीचे मार्गांत विवाहाचें विघ्न

ग्रेट ब्रिटनमधील कित्येक शाळांतून विवाहित स्त्री–शिक्षकांस नेमण्यांत येत नाहीं. गेल्या महिन्यांत त्या देशांत भरलेल्या स्त्री-शिक्षकांच्या एका परिषदेंत ह्या पद्धतीविरुद्ध एक ठराव पास करण्यांत आला. "एखादी स्त्री पार्लमेंटची सभासद झाली, तर तिचा सर्वत्र सत्कार होतो. सिनेमा नटी जितक्या जास्त वेळां विवाह करील, त्या मानानें तिची परिस्थिति सुधारते. परंतु सरकारी स्त्री–नोकरानें मात्र लग्न करतां कामा नये, हा नियम व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालणारा आहे" असे उद्गार एका भाषणांत निघाले. "स्त्री ही एक स्वतंत्र व्यक्ति आहे, हें अद्याप जगास पटत नाहीं. विवाहित स्त्री पुरुषावलंबी समजली जाते" अशी दुसरीची तक्रार होती.

अप-टु-डेट शिलाई करतां
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११९–१२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८–१२ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८–१३ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—९ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४९—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३२—६ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५८०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९४५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५३–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११९—६ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४२७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १६०—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६–१२ |
| सिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१–१५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ४ आ. ... | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,४००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६५—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २४२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १,०००—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—८ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०—२ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—५ |
| ,, केसर प्रत्येक मणास ... ... | ११–१५ |
| ,, सरया प्रत्येक मणास ... ... | ११—८ |

**विवाहित स्त्रियांनीं घर सांभाळावें; नोकरीच्या नादीं लागूं नये.**

विवाहित स्त्रियांनीं (कांहीं महत्वाचे अपवाद सोडून) कोणत्याहि धंद्यांत पगारी काम करण्यास प्रतिबंध करणारा कायदा हॉलंडमध्यें होण्याचें घाटत आहे. आपलीं घरें व मुलेंबाळें संभाळण्याचें सोडून पैशाच्या मागें लागणाऱ्या स्त्रियांच्या अव्यापारेषु व्यापारास आळा घालणें हा ह्या कायद्याचा उद्देश आहे. पुरुषवर्गांत माजलेली बेकारीहि ह्या कायद्यानें कमी होईल असा अंदाज आहे. ह्या कायद्याच्या योजनेनें हॉलंडमधील विवाहित स्त्रियांत खळबळ उडवून दिली आहे.

**इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्ट, लि.**

वरील कंपनीची पांचवी वार्षिक सभा मंगळवार, ता. १५ फेब्रुवारी रोजीं भरली होती. अहवालाचे वर्षीं कंपनीस २ लक्ष, ९१ हजार रु. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ४ टक्के दरानें करमाफ डिव्हिडंड देण्यास २ लक्ष रुपयांचा विनियोग करावा अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस होती. सर किकाभाई प्रेमचंद हे बोर्डाचे अध्यक्ष आहेत. भांडवल औद्योगिक मंडळ्यांचे भागांत गुंतवून आपल्या भागीदारांच्या पैशावर चांगलें डिव्हिडंड मिळवून देणें, हें ट्रस्टचें उद्दिष्ट आहे. ट्रस्टनें शेकडा ८० इतकी रकम हिंदुस्थानांत गुंतविली आहे. सरकारी रोख्यांत १०½% रकम असून बाकीची कंपन्यांच्या प्रेफरन्स व ऑर्डिनरी भागांत आहे.

**लोक कोणतीं पुस्तकें वाचतात ?**

कलकत्ता येथील इंपीरियल लायब्ररीमधून वाचण्याकरितां नेलेल्या पुस्तकांचे विषयास अनुसरून गट पाडल्यास, साहित्य, इतिहास व कायदा हे विषय सर्वांत लोकप्रिय असलेले आढळतात. चरित्रांची चौथी जागा आतां शास्त्रीय पुस्तकांनीं घेतली आहे. अर्थशास्त्रविषयक पुस्तकांची मागणी कमी झाली, हें सुचिन्ह नाहीं. एकंदरीनें १९३५-३६ पेक्षा १९३६-३७ सालीं जास्त पुस्तकें वाचकांनीं वाचण्यास नेलीं.


The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashiv Peth POONA



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]


एच. एच. दि छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९१ बुधवार, पुणें.

शिवणकलेचें अनुभविक शिक्षण मिळण्याचें
हिंदुस्थानांत फक्त हें एकच ठिकाण
**दि मॉडर्न टेलरिंग इन्स्टिट्यूट**
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
चालक–एम. एन. पाटसकर, F. C. D. (London)

## गव्हाचे पोहे

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

किल्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.


ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दुध्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.

## ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहितीकरितां लिहा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.



## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]

मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,




स्टॉकिस्ट : [illegible], [illegible] पुणें २

# दि गुड-वुइल
# ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती — माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**
**Last year 1936-37**
**Exceeds**
**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN
## Co-operative Insurance Society, Ltd.

( Estd. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
Manager : Bombay Branch.

Poona Office — 180, Budhwar Peth.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोमाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

SAHYADRI INS. Co
NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.